**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020.
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

विशेष कक्ष

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, मुंबई ४०० ०२०.
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in
E-mail : specialcell@sndt.ac.in

---

**जावक क्र.** विशेष कक्ष/अ-०४/२०२४-२५/ ३२.

**दि.** २८/०५/२०२४

**परिपत्रक :**

**विषय:** महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना अवलंबण्याच्या कार्यपध्दती, अटी व शर्तीसंदर्भात...

**संदर्भ :** १) अल्पसंख्यांक विभाग, शा.नि.क्र. अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि. २७ मे, २०१३
२) अल्पसंख्यांक विभाग, शा.परि.क्र. अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि. १८ जून, २०१४
३) विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र. विशेष कक्ष/अ-०४/२०२४-२५/३०, दि. २७/०५/२०२४

महोदया / महोदय,

महाराष्ट्र राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाच्या उपरोक्त संदर्भाधिन दि. २७ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार, राज्यातील अनुदानित व विना-अनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना अवलंबण्याच्या कार्यपध्दती, अटी व शर्ती विहित केल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक अनुदानित / विना-अनुदानित अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेमध्ये अभ्यासक्रमनिहाय आणि गुणवत्ता/गुणांकनिहाय खालील प्रमाणात अल्पसंख्यांक व बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे शासनाचे निर्देश आहेत ;

**अ) अनुदानित अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थाबाबतीत :** अभ्यासक्रनिहाय प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के जागांवर, त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या समुहाच्या विद्यार्थ्यांना (गुणवत्ता/गुणांकनिहाय) प्रवेश दयावेत. आणि, उर्वरित ५० टक्के जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांमधून भरतांना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभागांनी समाजातील अनु.जाती, अनु.जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, वि.मा.प्रवर्ग आणि इतर मागासप्रवर्ग इ. दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागांप्रमाणे प्रवेश देणे बंधनकारक आहे.

**ब) विना-अनुदानित अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थाबाबतीत :** अभ्यासक्रनिहाय प्रवेश क्षमतेच्या ५१ टक्के जागांवर, त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या समुहाच्या विद्यार्थ्यांना (गुणवत्ता/गुणांकनिहाय) प्रवेश दयावेत. आणि, उर्वरित ४९ टक्के जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांमधून भरतांना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभागांनी समाजातील अनु.जाती, अनु.जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, वि.मा.प्रवर्ग आणि इतर मागासप्रवर्ग इ. दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागांप्रमाणे प्रवेश देणे बंधनकारक आहे.

तथापि, राज्यातील अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना प्रदान केलेल्या संबंधित धार्मिक/भाषिक समुहातील विद्यार्थी प्रवेशासाठी उपलब्ध होत नसल्यास, संदर्भाधिन दि. १८ जून, २०१४ च्या शा.परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.

तसेच, अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची जाहिरात प्रसिध्द करणे, प्रवेश समिती गठित करणे आणि समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, विशेष मागासप्रवर्ग, इतर मागासप्रवर्ग, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग इ. प्रवर्गासाठी त्यांच्या टक्केवारीप्रमाणे आरक्षित केलेल्या जागांप्रमाणे प्रवेश देण्यासंदर्भात विद्यापीठाच्या उपरोक्त दि. २७/०५/२०२४ च्या परिपत्रकानुसार कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल विद्यापीठाचे कुलसचिव आणि विशेष कक्षाला पाठविण्यात यावा.

कळावे.

**(डॉ. विलास नांदवडेकर)**
कुलसचिव

**प्रती :** मा. प्राचार्य/प्रभारी,
विद्यापीठ संलग्न अल्पसंख्यांक महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.